नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १८ Issue - 18 | वार बुधवार दि. ४ जून २०२५ Blow- Wednesday Date 4 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्यातील प्रत्येकाला हक्काचे घर देणार; घरकुलांसाठी ग्रामीण भागात ८० हजार कोटींची गुंतवणूक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



### मुख्यमंत्री आणि केंद्रीय कृषी मंत्री यांच्या हस्ते महाआवास अभियान अंतर्गत पुरस्कारांचे वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागासाठी ३० लाख घरकुलांचे उद्दीष्ट मंजूर केले असून राज्यातील प्रत्येकाला हक्काचे घर देण्यात येईल, या माध्यमातून ग्रामीण भागात ८० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून प्रत्येकाला घर देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

ग्रामविकास व पंचायत राज व राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण- गृहनिर्माण विभागाच्यावतीने श्री छत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी येथे प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रमप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंग चौहान, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, फलोत्पादन व रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, ग्राम विकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, प्र.विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाचे सहसचिव गया प्रसाद, राजाराम दिघे,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते.

**नव्याने सर्वेक्षण करून प्रत्येक पात्र लाभार्थ्याला घरकुल देणार : केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान**

विक्रमी संख्येने महाराष्ट्रासाठी घरकुलांचे उद्दीष्ट मंजूर केल्याने केंद्रीय मंत्री श्री.चौहान यांना धन्यवाद देऊन मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, २०११ मध्ये झालेल्या सर्वेक्षणात बेघर असलेल्यांना घरे देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना सुरू करण्यात आली. राज्याचे उद्दीष्ट अत्यंत कमी होते. २०१७ मध्ये हे उद्दीष्ट पुरेसे नसल्याने अधिक उद्दीष्ट मंजूर करण्याची विनंती केंद्र सरकारकडे करण्यात आली. त्यानंतर आलेल्या आवास प्लस योजनेत ३० लाख बेघराची नोंद करण्यात आली. पहिल्या टप्प्याची घरे पूर्ण करीत असतांना केंद्राने २० लाख घरकुलांना मंजूरी दिली. त्यापैकी १० लाख घरांचा पहिला हप्ता ग्रामविकास विभागाने जमा केले आहे. आता नव्याने १० लाख घरकुलांचे पत्र मिळाल्याने जुन्या यादीपैकी एकही लाभार्थी घरकुलाशिवाय राहणार नाही. शिवाय अजून कुणी सुटले असल्यास नव्याने सर्वेक्षण करणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यावर शासनाचा भर**

'लखपती दिदी' योजनेच्या माध्यमातून महिलांची आर्थिक उन्नती होत आहे. राज्यातही यादृष्टीने प्रयत्न होत असून मागील वर्षी २६ लाख 'लखपती दिदी' झाल्या असून यावर्षी २५ लाख महिला लखपती दिदी होतील. अशा एक कोटी महिलांना 'लखपती दिदी' करण्याचे राज्याचे उद्दीष्ट आहे. आमच्या बहिणी याद्वारे सक्षम होऊन राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे कार्य करतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.यासाठी ग्रामविकास विभागाच्या मागे राज्य शासन खंबिरपणे उभे आहे, असेही ते म्हणाले. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाडक्या बहिणीच्या नावाने घर देण्यात यावे, असे आवाहनही श्री.फडणवीस यांनी केले.

**घरकुलांचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी महत्वाचे निर्णय**

घराची मुलभूत गरज पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने निर्धार केला असून राज्य शासनाने घरकुलासाठी ५० हजार रुपये अधिक देण्याचा निर्णय घेतला. दीनदयाल उपाध्याय घर खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत एक लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला. असून प्रधानमंत्री आवास योजनेच्या घराला सोलर पॅनल लावण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.घरासोबत इतर मुलभूत सुविधा गरीब माणसाला देण्यासाठी वेगाने काम करण्यात येत आहे. घरकुलांचे उद्दीष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी ग्रामविकास विभाग अत्यंत वेगाने काम करीत आहे. बेघरमुक्त महाराष्ट्राची संकल्पना राबविण्याचे प्रयत्न होत आहे. जागेची कमतरता असतांना दुमजली घरे, गृहसंकुलासारख्या संकल्पना राबवून ती समस्या दूर करण्यात आली. गायरान जमिनी देण्याचा निर्णय घेण्यात आला, गावठाणाची हद्दवाढ करीत जमिनीचे पट्टे देऊन घरकुलाचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्व प्रकारच्या योजना राबवून नागरिकांना घरकुलाचा लाभ द्यायचा आहे.

**प्रत्येक पात्र लाभार्थ्याला घरकुल देणार-केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान**

आजचा क्षण अभिमानास्पद आणि ऐतिहासिक असल्याचे नमूद करून केंद्रीय मंत्री श्री.चौहान म्हणाले, राज्याच्या ग्रामीण भागातील प्रत्येकाला हक्काचे घर मिळावे यासाठी केलेला संकल्प आज पूर्ण होत आहे. आज १० लाख घरकुलांचे उद्दीष्ट मंजूर केल्यानंतर एकही गरीब घरावाचून वंचित राहणार नाही. या घरकुलांच्या माध्यमातून गरिबांना केवळ घर मिळणार नाही, २० लाख घरांच्या माध्यमातून होणाऱ्या ६५ हजार कोटींच्या गुंतवणूकीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. अद्यापही २०१८ च्या यादीतून नाव सुटलेल्यांना घरे देण्यासाठी सर्वेक्षण करावे, नव्या सर्वेक्षणानंतर प्रत्येक बेघर माणसाला घर देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. घरकुल हा प्रत्येकाचा मुलभूत हक्क आहे. त्यामुळे घरकुल मंजूर करण्यासाठी असलेल्या अटी कमी करण्यात आल्या आहेत. आता दुचाकी असलेल्या, अडीच एकर बागायती किंवा ५ एकर जिरायती शेतजमीन असलेल्यांना किंवा १५ हजार रुपये मासिक उत्पन्न

**(पान २ वर...)**

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना

**महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोग सुद्धा स्वतंत्रपणे कार्यरत राहणार**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापन करण्यास तसेच आयोगासाठी पदनिर्मिती, जागा व अनुषंगिक खर्चास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. केंद्रीय स्तरावर देशात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याकरिता दोन स्वतंत्र आयोग आहेत. या दोन्ही आयोगांशी निगडीत विषय वेगवगळे आहेत. त्यामुळे दोन स्वतंत्र आयोग असणे आवश्यक आहे. तसेच ५१ व्या जनजाती सल्लागार परिषदेत महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार हा आयोग स्थापन करण्यात येत आहे. या आयोगाची रचना राज्य अनुसूचित जाती आयोगप्रमाणेच एक अध्यक्ष व चार अशासकीय सदस्य अशी राहील. आयोगाकरिता नव्याने २६ पदे निर्माण करण्यात येणार आहेत. या पदांसाठीचे तसेच आयोगाचे सदस्य यांचे वेतन, भत्ते आणि कार्यालयासाठी भाडे तत्वावर जागा, फर्निचर, वीज, दूरध्वनी, इंधन यांसह अनुषंगिक खर्चासाठी ४ कोटी २० लाख रुपयांच्या तरतुदीस बैठकीत मान्यता देण्यात आली.

दरम्यान, अनुसूचित जाती आयोग देखील स्वतंत्रपणे कार्यरत राहणार आहे. या दोन्ही आयोगांना वैधानिक दर्जा मिळावा यासाठी मंत्रिमंडळाने तत्वतः मान्यता दिली. त्यासाठीही आगामी काळात कार्यवाही करण्यात येणार आहे.

## ट्रम्प यांचा फोन येताच नरेंद्रजींनी शरणागती पत्करली; राहुल गांधींची पंतप्रधानांवर टीका



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : काँग्रेस नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान मोदींवर जोरदार हल्लाबोल केला आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानला प्रत्युत्तर देताना मात्र अमेरिकेच्या इशाऱ्यावर ऑपरेशन सिंदूर थांबवले, असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या फोन कॉलवर पंतप्रधान मोदींनी शरणागती पत्करल्याची खोचक टीकाही राहुल गांधींनी केली. तर काँग्रेसच्या ताकदीवर राहुल गांधीनी भाष्य केले. 'काँग्रेस पक्ष महासत्तांसमोर झुकत नाही,' असे गांधी म्हणाले.

राहुल गांधींनी भोपाळमधील एका सभेमध्ये भारत पाकिस्तानमधील युद्धविरामावर भाष्य केले. ते म्हणाले की, 'ट्रम्प यांनी फोन केला आणि नरेंद्रजींनी लगेच शरणागती पत्करली. राहुल गांधींनी असेही नमूद केले की, 'इतिहास साक्षी आहे, भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हे चरित्र आहे, ते नेहमीच झुकतात. पण अमेरिकेच्या धमकीला न जुमानता भारताने १९७१ मध्ये पाकिस्तान तोडला होता. काँग्रेसचे बब्बर शेर आणि सिंहीणी महासत्तांशी लढतात, कधीही झुकत नाहीत.'

ट्रम्प यांनी त्या बाजूने इशारा करताच फोन उचलला आणि म्हणाले - 'मोदीजी, तुम्ही काय करत आहात, नरेंद्रजी - शरण जातोय,' जी हुजूर करुन नरेंद्र मोदींनी ट्रम्प यांचा इशारा पाळला. तुम्हाला आठवत असेल, जेव्हा फोन आला नाही, तेव्हा ७ वा फ्लीट आला होता. १९७१ च्या युद्धातही शस्त्रे आली होती, विमानवाहू जहाज आले होते. पण इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या, 'मला जे करायचं होते, ते मी करेन.' हाच दोघांमधील फरक आहे.

दरम्यान राहुल गांधींनी आपल्या भाषणात आरएसएसवरही सडकून टीका केली. 'आता मला चांगलेच माहिती आहे, जर तुम्ही त्यांच्यावर थोडा दबाव आणला, थोडा धक्का दिला. तर ते घाबरून पळून जातात. स्वातंत्र्याच्या काळापासून त्यांना शरणागती पत्रे लिहिण्याची सवय आहे. जर एका सेकंदात थोडासा दबाव आणला तर, हे त्यांचे चरित्र आहे. गांधी म्हणाले की, 'काँग्रेस शरणागती पत्करत नाही.' महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू आणि सरदार पटेल यांचे उदाहरण देत राहुल म्हणाले की, 'हे लोक शरणागती पत्करणारे नाहीत.'

**यूएव्ही आणि यूसीएव्ही नष्ट करण्यात भारतीय सैन्याला यश**

**राफेल आणि एसयू-३० चा धडाका**

## ऑपरेशन सिंदूर; पाकिस्तानी हवाई दलाची ६ लढाऊ विमाने, ३० क्षेपणास्त्रं, यूएव्ही आणि यूसीएव्ही नष्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इस्लामाबाद: जम्मू-काश्मीरच्या पहगलामध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतानं ऑपरेशन सिंदूर राबवलं. भारतीय सैन्यानं पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे ९ तळ उद्धवस्त केले. यानंतर पाकिस्ताननं पलटवार करण्याचा प्रयत्न केला. भारतीय सुरक्षा दलांच्या तळांवर ड्रोन हल्ल्यांचे प्रयत्न केले. ते हाणून पाडत भारतानं पाकिस्तानच्या ११ हवाई तळांना लक्ष्य करत शेजाऱ्यांचं कंबरडं मोडलं. या संघर्षात पाकिस्तानचं नेमकं किती नुकसान झालं, याची माहिती आता समोर आली आहे.






ऑपरेशन सिंदूरमध्ये सहभागी असलेल्यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे दिलेल्या माहितीनुसार, भारतीय हवाई दलानं ६ आणि ७ मेच्या रात्रीपासून १० मेपर्यंत केलेल्या कारवाईत पाकिस्तानचं मोठं नुकसान झालं. या हल्ल्यात पाकिस्तानी हवाई दलाची ६ लढाऊ विमानं, २ अवॉक्स, १ सी-१३० विमान, ३० क्षेपणास्त्रं, यूएव्ही आणि यूसीएव्ही नष्ट करण्यात भारतीय सैन्याला यश आलं. भारतीय हवाई दलानं क्रूझ क्षेपणास्त्र हल्ल्यांचा वापर करत पाकिस्तानला दणका दिला. इंडिया टुडेनं याबद्दलचं वृत्त सुत्रांच्या हवाल्यानं दिलं आहे.

सुदर्शन एअर लॉन्च क्रूझ क्षेपणास्त्रं आणि जमिनीवरुन हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या मदतीनं सगळ्या लक्ष्यांचा यशस्वी वेध घेतला. सुदर्शन क्षेपणास्त्राच्या माध्यमातून ३०० किलोमीटर दूरपर्यंत अचूक हल्ले केले गेले. पाकिस्तानच्या भोलारी हवाई तळावर हल्ला करुन भारतानं एक स्वीडिश एअरबॉर्न अर्ली वॉर्निंग अँड कंट्रोल नष्ट केलं. या हवाई तळावर अनेकं लढाऊ विमानं उभी होती. पाकिस्ताननं हवाई तळावरील ढिगारा तातडीनं गोळा केला. त्यामुळे विमानतळावर असलेल्या लढाऊ विमानांचं नेमकं किती नुकसान झालं, याची माहिती समोर आलेली नाही.

ड्रोन आणि मिसाईल इंटरसेप्शन १० पेक्षा अधिक यूसीएव्हीना भारताच्या हवाई सुरक्षा यंत्रणेनं पाकिस्तानच्याच हवाई हद्दीत इंटरसेप्ट करुन हवेतच नष्ट केलं. पाकिस्तानी हवाई दलाचं सी-१३० लक्ष्य पाकिस्तान विरूद्धच्या संघर्षात ब्रह्मोस क्षेपणास्त्रांचा वापर करुन जमिनीवरुन जमिनीवरुन मारा केला गेला. पाकिस्तानच्या सी-१३० विमानाला भारताच्या ड्रोन्सनी लक्ष्य केलं.

राफेल आणि एसयू-३० यांनी जोरदार हल्ला चढवत दीर्घकाळ हवेत उडणाऱ्या चिनी ड्रोन्सना नष्ट केलं.

## देशात सक्रिय रुग्ण ४ हजार पार, महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : भारतात पुन्हा एकदा करोनाचा संसर्ग झपाट्याने वाढताना दिसत आहे. आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, सध्या भारतात सक्रिय रुग्णांची संख्या ४००० पेक्षा अधिक आहे. तर गेल्या २४ तासांत पाच जणांचा मृत्यू ओढावला आहे. देशात सर्वाधिक रुग्ण केरळमध्ये आढळून आले आहेत. गेल्या २४ तासांत केरळमध्ये १४१६ नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. तर महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात ४९४ आणि गुजरातमधून ३९७ नवीन रुग्ण आढळून आलेत.

कोरोना संसर्गजन्य रोग पुन्हा देशवासीयांची डोकेदुखी ठरण्याची चिन्ह आहेत. केरळ, तामिळनाडू, बंगाल आणि महाराष्ट्र या राज्यांत कोरोना पुन्हा डोकं वर काढत आहे. या राज्यांत अनेकजण कोरोनाचे बळी पडत आहेत. गेल्या २४ तासांत केरळ, तामिळनाडू आणि बंगालमध्ये प्रत्येकी एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. तर महाराष्ट्रात दोघांचा बळी गेला आहे. यामध्ये ज्यामध्ये ७० वर्षीय आणि दुसरी ७३ वर्षीय अशा दोन महिलांचा समावेश आहे, अशी माहिती आरोग्य मंत्रालयाने दिली. दरम्यान, तामिळनाडूमध्ये एका ६९ वर्षीय महिलेचा कोरोनामुळे बळी गेला. त्यांना मधुमेह आणि पार्किन्सनचा त्रास होता. तर पश्चिम बंगालमध्ये एका ४३ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला, त्याही अनेक आजारांनी ग्रस्त होत्या. केरळ, महाराष्ट्र आणि गुजरातसह दिल्ली, पश्चिम बंगाल, कर्नाटक, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशमध्येही प्रार्दुर्भाव वाढला आहे. संसर्ग तिपटीने वाढल्याचे चित्र आहे. देशात आता कोरोनामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ३० च्या वर पोहोचली आहे. केरळ आणि महाराष्ट्रात जास् रुग्णांचा मृत्यू झाला आहे. याचवेळी, आरोग्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या २४ तासांत ५०० हून अधिक लोक बरे झालेत आणि प्रकृती स्थिर आहे. तर आतापर्यंत बरे झालेल्या रुग्णांची संख्या २००० आहे.

इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चचे महासंचालक डॉ. राजीव बहल यांनी सोमवारी सांगितले की, पश्चिम आणि दक्षिण भारतातील विषाणूच्या नमुन्यांच्या जीनोम सिक्वेन्सिंगवरून असे दिसून येत आहे की, विषाणूचे सध्याचे स्वरूप ज्यामुळे प्रकरणे वाढली आहेत, ते गंभीर नाही.

## संपादकीय....

### नुकसान भरपाई

राज्यातील विविध भागात नुकत्याच झालेल्या पावसामुळे कापणी केलेल्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अशा प्रकारे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत विचार केला जाईल, असे नुकतेच मुख्यमंत्र्यांनी राज्य मंत्रिमंडळाची सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे बैठकीत सांगितले. या बैठकीच्या सुरवातीला राज्यात झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला गेला. त्यावेळी विविध मंत्र्यांनी कापणी केलेल्या पिकांचे नुकसान झाल्याचा मुद्दा उपस्थित केला. मदत आणि पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी सादरीकरणाद्वारे राज्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आणि मदतीची माहिती दिली. राज्य मंत्रिमंडळाच्या २७ मे रोजी झालेल्या बैठकीत घरांच्या पडझडींच्या दुरुस्ती आणि पुनर्बांधणी करीता तातडीने मदतीकरीता निधी द्यावा अशा सूचना केल्या होत्या. त्यानुसार ४९ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. कोकण विभागास पाच कोटी, पुणे विभागास १२ कोटी, नाशिक विभागास पाच कोटी, छत्रपती संभाजीनगर विभागास १२ कोटी, अमरावती विभागास पाच कोटी आणि नागपूर विभागास दहा कोटी असे एकूण ४९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. त्याचबरोबर खरीप २०२५ आणि यापुढील कालावधीकरिता केंद्र शासन अथवा राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेती पिकांच्या नुकसानीपोटी द्यावयाची भरपाई दर आणि निकष २७ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार देय राहतील. यामुळे एक जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचना अधिक्रमित करण्यात आल्या आहेत.

# महिलांच्या हक्कांसाठी राज्य महिला आयोग दक्ष : विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महिलांच्या प्रश्नात संवेदनशील राहून महिलांचे संरक्षण, महिला सबलीकरण या बरोबरच पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग काम करत आहे. या पुढील काळातही भविष्यातील दिशा, कार्यपद्धती व धोरणात्मक नियोजनाच्यादृष्टीने राज्य महिला आयोगाने धोरणात्मक नियोजन करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.

महाराष्ट्र विधिमंडळाचे उपसभापती कार्यालय व राज्य महिला आयोगाच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या कार्यपद्धती व कार्यक्षमतेबाबत संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या संवाद कार्यक्रमात उपसभापती डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. कार्यक्रमास महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, आमदार चित्रा वाघ, प्रज्ञा सातव, महिला व बाल विकास विभागाचे उपायुक्त राहुल मोरे, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया, महिला आयोग माजी अध्यक्ष सुशीबेन शहा, निर्मला सामंत प्रभावळकर, राजलक्ष्मी भोसले, नीता केळकर, उत्कर्षा रूपवते, मुमताज शेख, यांनी सहभाग घेत आपले विचार मांडले.

उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, राज्य महिला आयोग महिलांच्या प्रश्नासाठी काम करत आहे. महिला आयोग प्रभावीपणे कार्यरत असून त्याची कार्यक्षमता अधिक वाढवण्यासाठी यामध्ये सामाजिक संस्थांचा सहभाग, कायदे सल्लागार यांच्या सेवाही घेणे गरजेचे आहे.

आयोगासाठी स्वतंत्र व पुरेश्या निधीद्वारे महिलांच्या न्यायालयीन, वैयक्तिक आणि सामाजिक प्रश्नांवर प्रभावीपणे काम करता येईल. प्रत्येक तालुक्याच्या स्तरावर समुपदेशन केंद्र असण्यावर भर द्यावा लागेल. पीडितेस अनेक न्यायप्रक्रियांमध्ये सामोरे जावे लागते यासाठी सर्व प्रकरणांची एकत्रित सुनावणी किंवा समन्वयासाठी यंत्रणा निर्माण करण्यावर भर द्यावा लागेल. महिलांवरील अत्याचार प्रकरणात दोषसिद्धी प्रमाणाबाबत महिला आयोग, गृहविभाग, महिला व बालकल्याण विभाग आणि न्याय विभाग यांनी समन्वय ठेवण्याचे आवाहन डॉ.गोऱ्हे यांनी केले.




महिला व बाल विकास मंत्री कु. तटकरे म्हणाल्या, वन स्टॉप सेंटर्स योजनेत केंद्र शासनाच्या नव्या नियमावलीनुसार ही केंद्रे राज्य शासनाने चालवायची आहेत. यापूर्वी ही केंद्रे चालविण्याची जबाबदारी ‘एनजीओ’कडे होती. शासन ही केंद्रे चालवणार असल्याने वन स्टॉप सेंटर्सची संख्या वाढविण्यात येणार आहे.

महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी समाजात जनजागृती गरजेची असून आयोगाच्या उपक्रमांमध्ये पुरुषांचा आणि विशेषतः तरुणांचा सहभाग वाढवावा लागेल. राज्य महिला आयोगाच्या कार्यपद्धती व कार्यक्षमतेबाबत संवाद कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिलांनी महिला व बाल विकास अन्य संदर्भात उपस्थित केलेले प्रश्न, सूचना महत्वाच्या असून या सर्व सूचनांचा अहवाल गृह विभाग व मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवला जाईल.

महिला आयोगाच्या निधीत भरीव वाढ करण्यात आली आहे. २०१८-१९ मध्ये रुपये ३.११ कोटी इतके बजेट होते. २०२४-२५ मध्ये यात वाढ करण्यात येऊन ते आता १०.६० कोटी रुपये करण्यात आले असल्याचे तटकरे यांनी सांगितले.

आयोगाच्या कार्यक्षमतेसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून महिला आयोगाला पहिल्यांदाच एक स्थायी आयएएस दर्जाच्या महिला सदस्य सचिवाची नेमणूक करण्यात आली आहे. राज्यातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकाऱ्यांची सर्व रिक्त पदे भरण्यात आली आहेत. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. चाकणकर म्हणाल्या, १५० सामाजिक संस्था आयोगासोबत काम करत आहेत. आयोगाकडे प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन महिलांच्या प्रश्नांना न्याय देण्याची आयोगाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संगीता चव्हाण, कला शिंदे, प्रतिभा जगताप, सारिका पवार, सुनीता मोरे, कोयना विटेकर, नीरजा भटनागर, सुदर्शना त्रिगुणाईत, संगीता खोदना, वर्षा मोरे, उपस्थित होत्या. या कार्यक्रमात राज्य महिला आयोगमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती सादरीकरणातून देण्यात आली.

# अंबरनाथ, कल्याण व मुरबाड तालुका क्रीडा संकुलाची कामे तातडीने पूर्ण करा : क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अंबरनाथ, कल्याण व मुरबाड येथील तीनही तालुका क्रीडा संकुलाची उभारणी तसेच डागडुजी संदर्भात १५ दिवसांत कार्यवाही करण्याचे निर्देश क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.



मंत्रालयात अंबरनाथ, कल्याण, मुरबाड, नांदगाव, मनमाड येथील क्रीडा संकुलांबाबत आढावा बैठक झाली. यावेळी मंत्री श्री. भरणे बोलत होते.

क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, कल्याण क्रीडा संकुलात क्रीडा साहित्य खोली, तारेचे कुंपण, २०० मीटर धावण मार्ग तयार करण्यात यावा. मुरबाड येथे सद्यस्थितीत संकुलाच्या प्राप्त जागेवरच संकुल उभारणी करणे व अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षक भिंत उभारण्यात यावी. अंबरनाथ येथील तालुका क्रीडा संकुलात पावसामुळे पडझड झाली तेथील दुरूस्तीचे काम तातडीने करावे.

मनमाड येथील महर्षी वाल्मिकी क्रीडा संकुलामध्ये क्रीडा संदर्भात सर्व साहित्य पुरविण्यात यावे. इनडोअर जिम साहित्य, महिलांसाठी योगा, मेडिटेशन, हॉल बांधणे, सोलर पॅनल व त्यासंदर्भात कामे, नांदगाव येथे इनडोअर कबड्डी मॅट स्टेडियम बांधणे, संरक्षक भिंत, व्यायाम साहित्य, सोलर पॅनल पुरविण्यासंदर्भातील कामांची कार्यवाही करण्यात यावी. सांगली येथील कवठेपिरान येथे पै.कै. हिंदकेसरी जाकार्तावीर मारूती माने स्मारक समितीच्या मागणीनुसार स्मारकास परिसरात संरक्षण भिंत उभारणे आणि पुतळ्यात योग्य त्या सुधारणा करण्याचे निर्देश क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.

यावेळी आमदार किसन कथोरे, सदाशिव खोत, सुहास कांदे, प्रभारी आयुक्त सुधीर मोरे, उपसचिव सुनिल पांढरे, उपसंचालक सुहास पाटील, माणिक पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर, तहसिलदार अभिजित देशमुख, अमित पुरी, उपअभियंता संजय कोरडे, मदन हिरवे यांच्यासह जिल्हा क्रीडा अधिकारी, तालुका क्रीडा अधिकारी उपस्थित होते.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यामुळे कोळेगाव स्टेशनचा प्रश्न मार्गी : गणेश चिवटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कोळेगाव सब स्टेशन वर आधारित पाच ते सहा गावातील शेतकऱ्यांचा गेली अनेक दिवसांपासून प्रलंबित लाईटचा प्रश्न आता मार्गी लागला आहे.



कोळेगाव सब स्टेशन वरील आधारित शेतकऱ्यांनी भाजप नेते गणेश चिवटे यांच्याकडे लाईट विषयासंदर्भात तक्रार केली होती. यावेळी गणेश चिवटे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे पाठपुरावा केला यावर लगेच पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विशेष लक्ष देऊन या गोळेगाव टेशन आवश्यक असणाऱ्या दोन ब्रेकर ची व्यवस्था केली आहे. त्यामुळे या भागातील गावांना अपुऱ्या दाबाने होत असलेला वीजपुरवठा आता पूर्ण दाबाने आठ तास सुरळीत होण्यासाठी मदत होणार आहे. या नवीन ब्रेकर चे पूजन भाजप जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी गणेश चिवटे म्हणाले की कोळेगाव सब स्टेशनचा गेली अनेक दिवसापासून चा हा प्रश्न पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी विशेष लक्ष देऊन मार्गे लावला आहे लवकरच हे सब स्टेशन वर तीन के व्ही ए ऐवजी पाच के व्ही ए या ट्रान्सफॉर्मवर मंजूर करून या सबस्टेशनच्या कायमस्वरूपी चा विजेचा प्रश्न मार्गी लावतील असे या भागातील रस्ते व इतर कामे ही पालकमंत्री जयकुमार गोरे साहेब यांच्या माध्यमातून आपण मार्गी लावू असे मत यावेळी गणेश चिवटे आणि व्यक्त केले.

या कार्यक्रमात प्रसंगी कोळेगाव चे सरपंच तात्यासाहेब शिंदे, गोंडाचे सरपंच सुभाष आणि पुढे गावचे सरपंच नवनाथ जगदाळे वंचित बहुजन आघाडीचे नेते सुभाष मोहोळ श्रीमंत पाटील ,वैजनाथ चव्हाण, भाऊ चव्हाण ,विशाल घाडगे, रावसाहेब पाटील ,दत्ता बिटकुले ,ओमकार पुजारी ,नाना पुजारी ,भागवत पाटील ,पैलवान विजयी पैलवान हनुमंत पाटील, गणेश रोकडे ज्ञानेश्वर विचितकर अक्षय हात पुढे समाधान शिंदे, अतुल हेडगे ,चरण येडगे ,हनुमंत आतकरे ,सुनील जगदाळे ,तात्यजगदाळे ,उमेश जगदाळे ,सौरभ जगदाळे, रामा खराडे, सिद्धेश्वर जगदाळे , भीमराव जगदाळे, दत्ता ठोंबरे, संतोष जगदाळे, आत्माराम खडके ,वैभव खडके, युवराज पाटील ,आबा पाटील, नितीन शिंदे ,मिलिंद रोकडे, गणेश रोकडे, दया शेंडगे ,समाधान शिंदे ,बालाजी गोरे निखिल वीर श्रीमंत मोरे पिंटू निभवणीकर सचिन माने ,हनुमंत आतकरे ,अभी उपस्थित होते.

# राज्यातील प्रत्येकाला हक्काचे घर देणार; घरकुलांसाठी ग्रामीण भागात ८० हजार कोटींची गुंतवणूक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(पान १ वरून..) असलेल्यांनाही नव्या सर्वेक्षणात घरकुल मंजूर करण्यात येईल. महिलांनाही सन्मानाने जगता यावे यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेमुळे अर्ध्या लोकसंख्येला न्याय मिळाला असून या महिलांना ‘लखपती दिदी’ बनविण्याचे कामही करायचे आहे. या महिलांना उद्योगाशी जोडून समृद्ध करण्याचे कार्य करायचे आहे, असे त्यांनी सांगितले.

विकसीत भारतासाठी विकसीत शेती आणि समृद्ध शेतकरी उद्दीष्ट समोर ठेवून केंद्र सरकार काम करीत असून ग्रामीण भागात कृषी वैज्ञानिक मार्गदर्शन करण्यासाठी येणार आहेत. या विकसीत कृषी संकल्प अभियानात शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री.चौहान यांनी केले.

**हक्काच्या घरामुळे गरिबांना स्वाभिमान, सुरक्षितता आणि स्थैर्याचा आधार मिळाला : उपमुख्यमंत्री अजित पवार**

ग्रामविकास विभागाचा हा कार्यक्रम केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादीत नूसन आपल्या ग्रामविकास क्षेत्रात सामुहीक यश आणि प्रयत्नांचा उत्सव असल्याचे नमूद करून उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, आपले घर ही फक्त वास्तू नसून स्वाभिमान, सुरक्षितता आणि स्थैर्याचा आधार असतो, हा आधार राज्यातील लाखो नागरिकांना मिळाला आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत यावर्षी देखील लाखो नागरिकांना हक्काचे घर मिळणार आहे. देशात ३ कोटी नागरिकांना घर देण्याचे उद्दीष्ट प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ठेवले आहे. महाआवस अभियान राज्य शासनाचे अभिनव पाऊल होते. यात घरासोबत वीज, शुद्ध पाणी, रस्ता, गॅस जोडणी, स्वच्छता गृह आणि मनरेगा अंतर्गत रोजगार आदी मिळत असल्याने घर समृद्ध आणि राहण्याजोगे बनले आहे.

महाराष्ट्राला केंद्र सरकारने २० लाख घरकुलांचे उद्दीष्ट दिल्याबद्दल केंद्रीय ग्रामविकास मंत्री श्री.चौहान यांना धन्यवाद देऊन श्री.पवार पुढे म्हणाले, अधिकारी-कर्मचाऱ्यांनी क्षमतेने काम केल्याने एवढ्या मोठ्या प्रमाणात घरकुलांना मंजूरी मिळाली आहे. यापुढेदेखील या प्रयत्नात सातत्य ठेवून वेगाने घरकुले उभारावे लागतील. घरकुलासाठी गायरान जमीन देण्याचा क्रांतीकारी निर्णय शासनाने घेतल्याने अनेकांचे घराचे स्वप्न पुणे होईल. ग्रामीण गृहनिर्माण अभियान यशस्वी करण्याचा सर्वांनी प्रयत्न करावा. कष्टकरी सर्वसामान्य माणसाला त्याचा हक्क मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

घरकुलांची उद्दीष्टपूर्ती होण्यासाठी भरीव प्रमाणत निधी उपलब्ध करून देण्यात आला असून प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, अटल बांधकाम आवास योजना, पारधी आवास योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, मोदी आवास योजनांसारख्या योजनांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. या प्रकल्पांची ग्रामीण भागात वेगाने अंमलबजावणी करावी, असे आवाहन श्री.पवार यांनी केली. राज्याच्या ग्रामविकास विभागाने देशपातळीवर चांगली कामगिरी करून राज्याचा लौकीक उंचावला असून घरकुलाचे उद्दीष्ट पूर्ण करून या लौकीकात भर घातली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ग्रामविकास मंत्री श्री.गोरे म्हणाले, सर्वांसाठी घराचे स्वप्न पूर्ण करीत असतांना गेल्या ७ वर्षात राज्याला प्रधानमंत्री आवास योजनेचे १३ लाख ५७ हजार उद्दीष्ट मिळाले होते. यावर्षी २० लाख घरांचे विक्रमी उद्दीष्ट मिळाल्याने या योजनेच्या अंमलबजावणीला गती येईल. या घरांना मंजूरी देण्याचे काम ४५ दिवसात करण्यात आले आणि मंजूरी पत्र एकाच दिवशी देण्यात आले. घर बांधत असतांना लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी घरकूलासाठी ५० हजाराचे अतिरिक्त अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला.

घर बांधण्यासाठी वाळूची अडचण दूर करण्यासाठी मोफत ५ ब्रास वाळू देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भूमिहीन लाभार्थ्याला घर उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून गायरान, गावठाण जमीन उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच पं.दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत जमीन खरेदीसाठी १ लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ५० हजाराहून अधिक घरे पूर्ण केली असून पुढील वर्षभरात सर्व २० लाख घरे उभारण्याचा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. येत्या वर्षभरात ५० लाख ’लखपती दिदी’ करण्यात येतील, असेही श्री.गोरे म्हणाले.

यावेळी ‘अमृत ग्राम महा आवास अभियान-महाराष्ट्राची गौरवगाथा’ या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तिकेत पुरस्कार विजेत्यांची यशोगाथा देण्यात आली आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण आणि राज्य पुरस्कृत आवास योजनेअंतर्गत चांगली कामगिरी करणाऱ्या विभाग, जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायतींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच प्रतिनिधीक स्वरूपात महा आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलांच्या चावीचे लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले. केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना १० लाख घरांचे उद्दीष्ट पत्र सुपूर्द करण्यात आले.

**पुरस्कार प्राप्त विभाग, जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायतींची यादी**

अमृत महाआवास अभियान २०२२-२३ मध्ये उत्कृष्ट कार्य करणारे विभाग, जिल्हे, तालुके, ग्राम पंचायतींचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

**प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण**

कोकण विभाग प्रथम, नाशिक विभाग द्वितीय तर नागपूर विभाग तृतीय

राज्य पुरस्कृत आवास योजना

नाशिक विभाग प्रथम, कोंकण विभाग द्वितीय तर पुणे विभाग तृतीय.

**प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण**

अहिल्यानगर जिल्हा प्रथम, सिंधुदुर्ग जिल्हा द्वितीय, गोंदिया जिल्हा तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

अहिल्यानगर जिल्हा प्रथम, सिंधुदुर्ग द्वितीय, सातारा जिल्हा तृतीय.

**प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण**

अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुका प्रथम, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड द्वितीय, सातारा जिल्ह्यातील जवळी तालुका तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुका प्रथम, गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी द्वितीय, अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तालुका तृतीय.

**प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण**

सातारा जिल्ह्यातील येळगाव ता.कराड ग्रामपंचायत प्रथम, सातारा जिल्ह्यातील भुडकेवडी ता.पाटण द्वितीय तर वाशीम जिल्ह्यातील चोंढी ता.मानोरा तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

सातारा जिल्ह्यातील बोंद्रे ग्राम पंचायत ता. पाटण प्रथम, वाशीम जिल्ह्यातील कारखेडा ता. मानोरा द्वितीय, रत्नागिरी जिल्ह्यातील कुळवंडी ता.खेड ग्रामपंचायत तृतीय.

**प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण**

सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारतीसाठी जळगाव जिल्ह्यातील हनुमंत खेडे ग्रामपंचायत ता.धरणगाव प्रथम, भंडारा जिल्ह्यातील भोसा (टाकळी) ता.मोहाडी द्वितीय तर वाशीम जिल्ह्यातील मोहगव्हान ग्रामपंचायत ता. मानोरा तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारतीसाठी नाशिक जिल्ह्यातील अंतापूर ग्राम पंचायत ता. बागलाण प्रथम, परभणी जिल्ह्यातील डोंगरजवळा ग्रामपंचायत ता.गंगाखेड द्वितीय, पुणे जिल्ह्यातील शिंद ग्रामपंचायत ता.भोर तृतीय.

**प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण**

सर्वोत्कृष्ट गृहसंकुलासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील वांगदरी ग्रामपंचायत ता.श्रीगोंदा प्रथम, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गणोरी ता. फुलंब्री द्वितीय,सोलापूर जिल्ह्यातील लक्ष्मी दहिवडी ग्रामपंचायत ता. मंगळवेढा तृतीय.

**राज्य पुरस्कृत आवास योजना**

सर्वोत्कृष्ट गृहसंकुलासाठी अहिल्यानागर जिल्ह्यातील नांदगाव ग्रामपंचायत ता. अहिल्यानगर प्रथम, पुणे जिल्ह्यातील कुशेर बु. ता.आंबेगाव द्वितीय, चंद्रपूर जिल्ह्यातील डोंगरगाव ग्रामपंचायत ता. राजुरा तृतीय.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### आता पुरुषांनाही एसटीच्या प्रवासात विशेष सूट

**पंढरपूर :** एसीच्या प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी परिवहन मंत्र्यांनी रविवारी घोषणा केली. त्यानुसार आता महिला नव्हे तर पुरुषांनाही एसटीच्या प्रवासात विशेष



सवलत मिळणार आहे. एसटी प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना १५ टक्के सवलत देण्याची घोषणा यावेळी प्रताप सरनाईक यांनी केली. कमी गर्दी असणाऱ्या हंगामामध्ये प्रवाशांची संख्या वाढावी, त्यामुळे लांब पल्ल्याच्या प्रवास दरम्यान आगाव आरक्षण करणाऱ्या प्रवचना तिकीट दरामध्ये १५ टक्के सवलत देण्याची घोषणा सरनाईक यांनी केली.

# मागासवर्गीय व अपंग योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

## वैयक्तिक अर्ज स्विकारणे चालू; अक्कलकोटचे गट विकास अधिकारी शंकर कवितके यांची माहिती






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/ प्रतिनीधी : सन २०२५-२६ यावर्षाच्या २०% मागासवर्गीय कल्याण निधी व ५% अपंग कल्याण निधी अंतर्गत वैयक्तिक योजनांचे अर्ज स्विकारणे चालू असल्याचे माहिती अक्कलकोटचे गट विकास अधिकारी शंकर कवितके यांनी सांगितले.

**२०% मागासवर्गीयकल्याण योजना**

मागासवर्गीयांना शेळीगट (४ शेळया १ बोकड), मागासवर्गीय विदयार्थ्यांना MS-CIT प्रशिक्षण, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना TALLY प्रशिक्षण, मागासवर्गीय महीलांना शिलाई मशिन खरेदी करीता अनुदान, मागासवर्गीय महीलांना मल्टीपर्पज्ञ पल्वरायझर मशीन खरेदी करीता अनुदान, मागासवर्गीयांना झेरॉक्स मशीन खरेदी करीता अनुदान, मागासवर्गीय महीलांना सोलर, ड्रायर/डिहायड्रर मशीन खरेदी अनुदान, आणि ५% दिव्यांगकल्याण योजना, दिव्यांगांना शेळीगट (४ शेळया + १ बोकड)- दिव्यांगांना झेरॉक्स मशीन, दिव्यांगांना पिठ गिरणी, दिव्यांग स्वयंसहायता समुहांना अर्थसहाय्य्-, दिव्यांगांना E-motion vehicle.

असे विविध योजना चालू असून सदर योजनेसाठी लाभार्थी यांनी पंचायत समिती अक्कलकोट यांच्या कडे अर्ज करावे प्रस्ताव सोबत जाती दाखला आधार कार्ड, बँक पासबुक, रेशन कार्ड उत्पन्न दाखला, अपंगानी अपंग दाखला जोडणे आवश्यक आहे सदर अर्ज करण्याचे आवाहन समाजकल्याण अधिकारी शंकर कोळी यांनी केले आहे.

# श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे आयएमसी बैठक संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे आयएमसी बैठक संपन्न झाली सदर बैठकीचे अध्यक्षस्थानी संस्थेचे गटनिदेशक तथा प्रभारी प्राचार्य श्री दिलीपकुमार गायकवाड यांनी भूषविले प्रमुख पाहुणे म्हणून आय एम सी चे अध्यक्ष श्री राजशेखर हिप्परगी व उपाध्यक्ष श्री यशवंत धोंगडे आणि नवनियुक्त सदस्य श्री कमलाकर सोनकांबळे श्री शिवशंकर स्वामी आणि मसुती हे होते सदर बैठकीमध्ये संस्थेच्या विकासाबद्दल चर्चा झाली संस्थेत येणारी प्रवेश या संदर्भातील अडचणी यावर चर्चा झाली संस्थेचे प्लेसमेंट याबद्दल चर्चा झाली यावर्षी संस्थेतील ६० विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट महिंद्रा अँड महिंद्रा कंपनी पुणे येथे झाली याबद्दल अध्यक्ष यानी प्रशिक्षणाथी त्यांचे कौतुक केले त्याचप्रमाणे मार्गदर्शनामध्ये श्री हिपरगी यांनी सर्व सदस्यांना आणि संस्थेतील शिल्प निदेशकाना मार्गदर्शन केले सदर बैठकीमध्ये नमनियुक्त सदस्य श्री कमलाकर सोनकांबळे आणि मसुती व स्वामी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले व त्यांना आयएमसीचे महत्त्व सांगण्यात आले त्याच प्रमाणे संस्थेमध्ये विविध विकास कामांतर्गत येणारी कामे नगरपरिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्याचे आश्वासन यशवंत धोंगडे यांनी दिले त्याचप्रमाणे सदर बैठकीमध्ये स्थानिक पातळीवर उत्तीर्ण प्रशिक्षण त्यांना शिकवू उमेदवारी किंवा नोकरी मिळण्याची आश्वासन श्री हिप्परगी यांनी दिले त्याचप्रमाणे कौशल्य विकास अंतर्गत येणारे वेगवेगळे कोर्सेस नवीन कोर्सेस व ऑयोजना राबविण्याचे आश्वासन दिले.

यामध्ये सदर बैठकीचे सूत्रसंचालन श्री एमजी नदाफ सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री मंठाळे सर यांनी केले. सदर बैठक यशस्वी होण्याकरिता संस्थेतील सर्व संदेश कर्मचारी वृंद यांचे अनमोल सहकार्य लाभले.

# राज्यस्तरीय कुराश स्पर्धेत ठाणे जिल्ह्यासाठी खेळून उदयन घोरपडे याने जिंकले सुवर्णपदक!




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : कोल्हापूर येथे कुराश असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दि. २९ व ३० मे २०२४ रोजी पार पडलेल्या सब ज्युनिअर स्टेट कुराश चॅम्पियनशिप २०२४-२०२५ मध्ये ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत उदयन अजित घोरपडे याने पहिल्यांदाच सहभागी होत उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले. या यशाबद्दल उदयन घोरपडे व त्यांचे प्रशिक्षक मुंबई विभाग प्रमुख व कोच आकाश जाधव यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

उदयन हा अत्यंत जिद्दी आणि चिकाटीने खेळणारा खेळाडू आहे. तो मत्त्यापूर तालुका सातारा या गावचा रहिवासी असून कराड उत्तरचे आमदार मनोज दादा घोरपडे यांचा तो पुतण्या आहे व उदयन घोरपडे चे वडील अजित घोरपडे हे सार्वजनिक बांधकाम मंत्री नामदार श्रीमंत शिवेंद्रराजे भोसले यांचे स्वीय सहाय्यक आहेत. उदयन ला कुराशबाबत फारशी माहिती नव्हती आणि सध्या तो गावी असल्यामुळे सरावाचीही संधी मिळाली नव्हती. तरी देखील त्याने जिद्द चिकाटी व मार्गदर्शन च्या जोरावर सुवर्णपदक मिळवले. ठाणे जिल्ह्याच्या इतर खेळाडूंनीही केलेली उज्वल कामगिरी केली त्यात. राजवीर देशमुख - सुवर्णपदक, आयुषी केंद्रे - रौप्यपदक

स्वरा गायकवाड - रौप्यपदक, या सर्व खेळाडूंनी ठाणे जिल्ह्याचा नावलौकिक राज्यस्तरावर वाढवला आहे, या यशाबद्दल कुराश असोसिएशन महाराष्ट्र चे अध्यक्ष अंकुश नागर व महासचिव शिवाजी साळुंखे त्याचबरोबर कराड उत्तरचे आमदार मनोज दादा घोरपडे यांनी सर्व खेळाडूंना आणि प्रशिक्षकांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# साई लॉन्स येथे स्नेहलता जाधव यांच्या विवाह सोहळ्याला डॉ. विश्वासराव आरोटे यांची उपस्थिती




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोले - महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी व दैनिक समर्थ गांवकरी समूहाचे पत्रकार दत्ता जाधव यांची पुतणी स्नेहलता हिचा विवाह सोहळा साई लॉन्स येथे थाटात संपन्न झाला. या प्रसंगी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून नववधूला शुभेच्छा दिल्या.

या समारंभात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी साई लॉन्स येथे भेट देऊन सहपरिवार स्नेहलता व तिच्या कुटुंबीयांचा सत्कार केला. त्यांच्या सोबत सोनेरी आरोटे यांचीही विशेष उपस्थिती होती. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी नवविवाहित दाम्पत्याला उज्ज्वल व यशस्वी वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम प्रसन्न वातावरणात पार पडला.

# दुधनी येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे जयंती उत्साहात साजरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (ता. प्रतिनिधी) : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे महाराष्ट्राच्या रणरागिणी राजमाता,लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३००.व्यां जयंती निमित्त अभिवादन करण्यात आली आहे.

दुधनी येथील सामजिक कार्यकर्ते आझम भाई शेखजी यांनी त्यांच्या संपर्क कार्यालयात प्रारंभी लोकमाता पुण्य श्लोक अहिल्याबाई होळकर यांची प्रतिमेला येथील धनगर समाजाचे अध्यक्ष एकनाथ मोसलगी सर यांच्या हस्ते यांच्या पुष्पहार अर्पण करुन पूजा करण्यात आले.

या वेळी प्रमुख अतिथी म्हणून आर पी आय (आठवले गट) सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, मानव सेवा फाऊंडेशन अध्यक्ष दत्ता कांबळे,आंदेवाडी सरपंच रमेश धोडमनी,मुस्लिम समाजाचे ज्येष्ठ नागरिक हाजी रौफ साब निंबाळ, सामाजिक कार्यकर्ते आझम भाई शेखजी, पत्रकार निंगप्पा निंबाळ,सामाजिक कार्यकर्ता बसू गुरूभेट्टी,रमझान नदाफ आदीसह इतर कार्यकर्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी एकनाथ मोसलगी व दत्ता कांबळे यांचे समयोचित भाषणे झाली.कार्यक्रमाचे सूत्र संचालन आजमी शेख यांनी तर शेवटी रौप निंबाळकर यांनी आभार प्रदर्शन केली आहे.

## अनंत चैतन्य प्रशालेत माजी विद्यार्थी मेळावा आनंदात साजरा

### १९ वर्षांनी पुन्हा एकत्र; सन २००५-०६ बॅचचे विद्यार्थी

# शाळेची वाजली पुन्हा घंटी, ताज्या झाल्या जुन्या आठवणी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : लहानपणी अभ्यासाच्या भीतीने, शिक्षकांच्या धाकाने नको नकोशी वाटणारी शाळा मात्र मोठेपणी कशी हवीहवीशी वाटते याचा अनुभव प्रत्येकांना आला कारण बनले महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य.व उच्च माध्यमिक प्रशालेच्या रविवार दिनांक १ जुन २०२५ रोजी भरलेल्या माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्याचे सन २००५-०६ मध्ये इ. १० वीत शिकलेले जवळपास पन्नास विद्यार्थी १९ वर्षांनी पुन्हा एकत्र जमले असल्याने परत भेटत असल्याचा आनंद एकमेकांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता.प्रारंभी या सर्व माजी विद्यार्थ्यांनी प्रशालेचे माजी प्राचार्य श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी व सर्व शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे औक्षण करुन गुलाबपुष्प उधळत स्वागत केले. सुरुवातीला गीतांजली हेगडे व लक्ष्मी हेगडे यांनी उपस्थित सर्वांचे शब्द सुमनांनी स्वागत केले.

यानंतर विद्यादेवी सरस्वती व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सरांच्या प्रतिमेचे पुजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आले. व याचवेळी प्रशालेचे दिवगंत शिक्षक व माजी विद्यार्थी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यानंतर या कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रशालेचे माजी प्राचार्य श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी व उपस्थित सर्व आजी- माजी शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे फेटा, शाल, भेटवस्तू व बुके देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी ज्योती मसरे , महादेव बनसोडे, संगिता हेगडे, स्वप्नील फटाले,प्रदीप भरमशेट्टी यांनी शालेय जीवनातील आपले गंमतीशीर किस्से व सोबतच त्यावेळी शाळेकडून गिरवले गेलेले संस्काराचे धडे कसे आपल्या जीवनात उपयोगी पडत आहेत याचा अनुभव आपल्या मनोगतातून व्यक्त केला.यानंतर सेवानिवृत्त शिक्षक श्री.चंद्रकांत व्हनमाने, श्री. बसवराज बंडगर व श्री.बापुजी निंबाळकर यांनी विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.यानंतर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांनी अंधारातून प्रकाशाकडे नेणारी, अज्ञानाकडून ज्ञानाकडे नेणाऱ्या या ज्ञान मंदीरातील ज्ञान ज्योत अखंडपणे तेवत राहावी अशा भावनेने या माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला भेटस्वरुपात दिल्या गेलेल्या पितळी समईबद्दल या विद्यार्थ्यांचे कौतुक करून आभार मानले व आजचा हा सोहळा केवळ माजी विद्यार्थी स्नेहमेळावा नव्हे तर आमच्याप्रतीचा हा कृतज्ञता सोहळा आहे असा भाव आपल्या भाषणातून व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या या उत्तम अशाप्रकारच्या नियोजनरित्या केलेल्या कार्यक्रमाबद्दल अभिनंदन केले.यानंतर प्रशालेचे माजी प्राचार्य व मार्गदर्शक श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी सरांच्या हस्ते प्रशालेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले.याप्रसंगीआजी- माजी शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व माजी विद्यार्थी यांनी एकत्रितपणे स्नेह भोजनाचा आस्वाद घेतला. यानंतर वर्ग भरवण्यात आले. एरवी अभ्यास न केल्याने शाळा चुकवणारे, अर्ध्यातून पळून जाणारे माजी विद्यार्थी आजच्या वर्गात मात्र आवर्जून हजर होते व छडीला घाबरून हात चुकवणारी, सर हळू मारा असे म्हणणारी मुले- मुली आज मात्र शिक्षकांचा मार खाण्यासाठी आसुसल्याचा प्रत्यय आज आला. यावेळी श्री. ज्ञानदेव शिंदे, श्री.सरदार मत्तेखाने,मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे यांनी पुन्हा एकदा शिकत असल्याचा आनंद या विद्यार्थ्यांना प्राप्त करून दिला.यानंतर या सर्व मुलां- मुलींनी खो-खो, संगीत खुर्ची, तळ्यात- मळ्यात, समुह नृत्य असे विविध खेळ खेळत आजचा हा स्नेहमेळावा आनंदमय वातावरणात साजरा केला.यावेळी हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते सागर कल्याणशेट्टी यांनी सदिच्छा भेट दिली तेंव्हा या विद्यार्थ्यांकडून त्यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विठ्ठल हताळे यांनी व सुत्रसंचालन चन्नवीर हेगडे ,प्रियांका भरमशेट्टी यांनी केले तर आभार सिद्धाराम गोगावे यांनी मानले. हा स्नेहमेळावा यशस्वीपणे संपन्न व्हावा यासाठी नागेश कलशेट्टी,सिद्धाराम हेगडे,रमेश छत्रे, लक्ष्मण पारतनाळे, महादेव पाटील, रियाज खुजादे, उमेश इरवाडकर, ज्योती चिकणे,संगिता हेगडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सिंदखेडाराजा येथील भूमि अभिलेख विभागाच्या कर्मचाऱ्यांचा संप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी / राहुल साबळे : महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख तांत्रिक कर्मचारी संघटना पुणे विभागाने पुकारलेले १५ मे २०२५ पासून च्या व त्यांना साथ देत विदर्भ भूमी अभिलेख कर्मचारी संघटना ही २६ मे २०२५ पासून संपात सहभागी सहभागी झाली आहे, तसेच महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख तांत्रिक कर्मचारी संघटनाही आज दिनांक ०३ जून २०२५ पासून संपात सहभागी झाली आहे.




**कर्मचाऱ्यांच्या मागण्या**

१) भूमि अभिलेख विभागास तांत्रिक वेतन श्रेणी लागू करावी

२) भुकरमापक आणि परिरक्षण भुमापक ची रिक्त पदे भरावीत

३) व्हर्जन २ व EPCIS ची साईट सुरळीत करावी

४)सर्व भुकरमापकांना लॅपटॉप व रोवर उपलब्ध करून द्यावीत

५)वर्ग २ आणि वर्ग ३ ची पदोन्नती करण्यात यावी

६)नवीन नगर भुमापन कार्यालय स्थापन करण्यात यावी

७) शासन निर्णयाप्रमाणे भूमि अभिलेख विभागातील पदनामामध्ये बदल करावा

वरील सर्व संघटनाच्या संपाचे मुख्य मागणी ही तांत्रिक वेतन श्रेणी आहे, जो पर्यंत लागू होत नाही तो पर्यंत आता माघार नाही, अशी भूमिका सर्व संपकरी कर्मचाऱ्यांची आहे.

# बोरिवली येथे 'एटीएस'चे २२ घरांवर छापे

## अनेक संशयितांची चौकशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी : मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी तालुक्यातील पडघा नजीकच्या बोरिवली गावात पहाटे ३ च्या सुमारास महाराष्ट्र दहशतवादीविरोधी पथकाने (एटीएस) कॉम्बिंग ऑपरेशन करून २२ ठिकाणी छापेमारी केली. १० तासांच्या या कारवाईत संशयितांकडून आक्षेपार्ह कागदपत्रे ताब्यात घेतली. या कारवाईबाबत कमालीची गुप्तता बाळगण्यात आली होती.

ठाणे ग्रामीण पोलिस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली या कारवाईदरम्यान ठाणे ग्रामीण, रायगड ग्रामीण येथील ४०० पोलिस, शीघ्र कृती दलाच्या जवानांनी गावाला वेढा दिला होता, तर महाराष्ट्र एटीएस पथकातील सुमारे १०० अधिकारी, कर्मचाऱ्यांनी २००३ च्या मुंबईतील साखळी बॉम्बस्फोटातील आरोपी साकिब नाचण याच्यासह अनेक घरांत शोधमोहीम राबवली. या पथकामध्ये पोलिस अधिकारी, कर्मचारी यांचा सहभाग होता. कारवाईत अडथळा आणला जाऊ नये, यासाठी खबरदारी घेण्यात आली होती. एटीएसच्या या झडतीसत्रात एकूण २२ घरांमध्ये सर्च ऑपरेशन करून तेथील संशयित व्यक्तींचे आक्षेपार्ह कागदपत्रे ताब्यात घेण्यात आली. एटीएस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी ५ वाजेपर्यंत कोणालाही अटक केली नसल्याचे सांगण्यात आले. मात्र, या कारवाईबाबत कमालीची गुप्तता पोलीस यंत्रणेकडून पाळण्यात येत आहे.



## भारत गौरव यात्रा दुरिस्ट ट्रेन या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज प्रेरणास्थळ भेट मोहिम सुरू

**ज्या युवक, शिवप्रेमी, इतिहास प्रेमी यांना या प्रेरणादायी यात्रेत सहभागी व्हावयाचे आहे, त्यांनी तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर येथे संपर्क साधावा**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने भारत गौरव यात्रा दुरिस्ट ट्रेन या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज प्रेरणास्थळ भेट मोहिम सुरू करण्यात येत असून हा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाली वारसाला मानवंदना देणार असून नागरिकांना त्यांच्या जीवनाशी संबंधित प्रमुख किल्ल्यांप्रमाणेच त्या भोवतीच्या धार्मिक स्थळांचा अविस्मरणीय प्रवास घडवून आणण्यासाठी संधी देतो.

या योजने अंतर्गत पहिली ट्रेन ९ जून २०२५ रोजी (तिथीनुसार शिवराज्याभिषेक दिनी) मुंबई सीएसटी या स्थानकावरून सुटणार असून या उपक्रमात सक्रिय सहभाग घेणेबाबत सुचित केले आहे.

त्याअनुषंगाने ज्या युवक, विद्यार्थी, विद्यार्थी शिवप्रेमी, इतिहास प्रेमी यांना या प्रेरणादायी यात्रेत सहभागी व्हावयाचे आहे. त्यांनी तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर येथे संपर्क साधावा.

याबाबत भारतीय रेल्वेचे प्रतिव्यक्ती टूर किंमत पुढीलप्रमाणे स्लीपर इकोनॉमी- १३ हजार १५५ रुपये, ३ एसी कम्फर्ट- १९ हजार ८४० रुपये, २ एसी सुपीरियद- २७ हजार ३६५ रुपये तरी कृपया अधिकतम माहितीसाठी तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले आहे.

# पर्यावरण रक्षक सायकल मित्र पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/वृत्तसेवा :जागतिक सायकल दिन (३ जून) आणि जागतिक पर्यावरण दिन (५ जून) या निमित्ताने पंढरपूर सायकल क्लबच्या ७व्या वर्धापन दिनी दैनंदिन कामात सायकल वापरणाऱ्या पर्यावरण रक्षक सायकल वीरांचा सन्मान करण्यात आला. उमेश परिचारक (संस्थापक अध्यक्ष) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात प्रशांत खलीपे, डॉ. आरिफ बोहरी, प्रणव परिचारक, जहूर खतीब उपस्थित होते.

सुरज अष्टेकर (उपाध्यक्ष) यांनी स्वागत भाषण केले, तर अभिजीत कुलकर्णी (कार्यकारी अध्यक्ष) यांनी क्लबची माहिती सांगितली. रेखाताई चंद्रराव यांनी झाड वाचवण्याची शपथ घेतली. संतोष पाटोळे आणि सुनील शिरसागर यांनी सन्मानित व्यक्तींची माहिती वाचली.

**सायकल मित्र पुरस्कार:**

विजयकुमार कापसे, आनंदा माने, भिकाजी जाधव, शंकरराव कदम, श्रीकांत ढाळे, असलम बेद्रेकर, वंदनाताई सुरवसे, वंदनाताई बुधनेर यांना सन्मानचिन्ह आणि रोप देऊन गौरवण्यात आले.

**विशेष सन्मान:**

गणेश अधटराव (२५६ सायकल वाटप) आणि मयूर परिचारक (१३० सायकल वाटप) यांना रोप देऊन सत्कार करण्यात आला.

**सायकलवारी संमेलनाचे आव्हान:**

उमेश परिचारक यांनी २२ जूनला होणाऱ्या सायकल संमेलनात ४,००० सायकलिंग उत्साहींना सहभागी होण्याचे आवाहन केले. प्रकाश शेटे यांनी आभार मांडले, तर रेखाताई चंद्रराव यांनी सूत्रसंचालन केले. सतीश चंद्रराव, संतोष कवडे, अनिकेत गोजारी, लक्ष्मण पांढरे, निखिल चिंचोळकर, गजेंद्र पवार, महेश भोसले यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मदत केली.

## सुप्रसिद्ध निवेदक शशिकांत चव्हाण यांना मातृशोक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : कल्याण येथे वास्तव्यास असलेले सर्वांचे सुपरिचित सुप्रसिद्ध निवेदक शशिकांत नारायण चव्हाण यांच्या आई आनंदीबाई नारायण चव्हाण यांच नुकताच दीर्घ आजाराने निधन झाले आहे. आनंदीबाई या अत्यंत मितभाषी व सर्वांशी प्रेमाने व कुटुंबियांना सुसंस्कृत करणाऱ्या आई असा त्यांचा परिचय आहे. त्यांच्या पश्चात त्यांचे पती अन्नपूर्णा नगर कल्याण ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नारायण चव्हाण, मुलगा जी. बी पारसीक बँकेचे मॅनेजर अनिल चव्हाण, बहीणी,नातवंडे पतरुंडे असा भरगच्च परिवार आहे. त्यांचे अंतिम संस्कार कार्य व आदरांजली सभा रविवार दिनांक ०८ /०६/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या राहत्या घरी मुक्काम भोकरी (पडघा) तालुका भिवंडी जिल्हा ठाणे येथे होणार आहेत.

# करमाळा तालुक्यातील सुपुत्र एव्हरेस्ट वीर. शिवाजी ननवरे यांनी जगातील चौथ्या उंचीचे लोहतसे शिखर केले पार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कोंडीज तालुका करमाळा जिल्हा सोलापूर येथील सुपुत्र एवरेस्ट वीर तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक शहर गुन्हे शाखा शिवाजी लक्ष्मण ननवरे यांनी जगातील चौथ्या उंचीचे लोहतेस शिखर आज सर केले, तसेच या अगोदर जगातील सर्वात उंच एवरेस्ट शिखर(८८४८ मीटर) त्यानंतर मकालू शिखर (८४८४ मीटर) त्यानंतर मनासलू शिखर(८१६३ मिटर) व आता जगातील चौथ्या क्रमांकाचे लोह तसे शिखर(८५१६ मीटर) त्यांनी सर केले. अत्यंत खराब वातावरण असताना सुद्धा दिनांक २३/०५/२०२५ रोजी ४० दिवस नेपाळी येथे तळ ठोकून जिद्द व चिकाटीच्या जोरावर नियमित खडतर सराव करून आपले कर्तव्य बजावून शिखर यशस्वीरित्या सर केलेली आहे त्यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी सांगितले की माझी शिखर सर केलेली हेच हे ऑपरेशन शेंदूर मध्ये शहीद झालेले जवान व पहलगाम हल्ल्यात मृत्यू पडले नागरिक यांना समर्पित करतो असे त्यांनी सांगितले आहे. तसेच की ८००० मीटर उंचीपेक्षा जास्त उंचीची चार शिखरे सर करणारी देशातील तसेच महाराष्ट्र पोलीस दलातील एकमेव आणि पहिले पोलीस अधिकारी आहेत.






सोलापूर जिल्ह्यातील आणि पोलीस खात्याला त्याचा सार्थ अभिमान आहे. त्यांच्या आयुष्याबद्दल कोंडज गावातील ग्रामस्थ तसेच पुणे पोलीस दलातील सहकारी मित्रांनी अभिनंदन केले.

**अजयनगर शिवसेना भवन येथे कार्यक्रम संपन्न** — **कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने**

# आदर्श लोकसंचलीत साधन केंद्र खोणी भिवंडी यांची वार्षिक सर्वसाधारण सभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : महिला आर्थिक विकास महामंडळ स्थापित आदर्श लोकसंचलित साधन केंद्र खोणी, भिवंडी यांची ५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २८.०५.२०२५ रोजी भिवंडी, अजयनगर शिवसेना भवन येथे कार्यक्रम संपन्न झाले.

यावेळी वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी संजय गरजे महिला आर्थिक विकास महामंडळ ठाणे यांनी बचत गटातील महिलांना स्वतःच्या विकास कस करायचं, स्वतःच्या पायावर ऊभे रहाणे गरजेचे आहे. महिला आर्थिक, सामाजिक राजकीय दृष्टीने सक्षम झाली पाहिजे. अशा प्रकारे मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचं प्रमाणे आदर्श लोकसंचालित साधन केंद्राची खोणी या संस्थेच्या अध्यक्ष पदी सोनल रापटे व उपाध्यक्ष उर्मिला शिंगे यांची निवड केली तसेच सचिव म्हणून सरिता भगत व सदस्या ची निवड कार्यक्रमात करण्यात आली. त्याच प्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभे मध्ये उत्कृष बचत, उत्कृष ग्राम संघांचे, उत्कृष्ट सी आर पी समुदाय साधन व्यक्ती तसेच सहयोगिनी ज्योती जाधव, पद्मिनी जाधव यांचे गुणगौरव व सन्मान करण्यात आला.




तसेच जिल्हा नियोजन ठाणे मार्फत मिळालेल्या रसवंती , पापड मशीन व कांडप मशीन चे गरजू महिलांना मशीनचे वाटप वरिष्ठ जिल्हा समन्वय अधिकारी संजय गर्जे, तालुका अभियान व्यवस्थापक पंढरी भला, हेमंत पाटील, आय सी आय सी आय बँकेचे अधिकारी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. कार्यक्रमा मध्ये आदर्श लोकसंचालीत साधन केंद्राचा शाश्वत आराखडा २०२५- २०२६ चे वाचन करून मंजुरी घेण्यात आली. तसेच संस्थेच्या २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात खर्चाचे सादरीकरण करून मंजूर घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे व्यवस्थापक सचिन स वाघचौरे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.


महाराष्ट्र शासन

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट, जि. सोलापूर.**

म्हाडा कॉलनी जवळ, स्टेशन रोड, अक्कलकोट.

e-mail : itisoakt@yahoo.com websire http://www.dvet.gov.in

Industrial Training Institute

**या संस्थेत प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ करीता खालील व्यवसायामध्ये ONLINE पध्दतीने प्रवेश सुरु**

**प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५**

| अ.क्र. | व्यवसाय (ट्रेड) चे नाव | कालावधी | किमान शैक्षणिक पात्रता | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|---|
| १. | ड्रेसमेकींग | १ वर्ष | SSC पास/नापास | 20 |
| २. | संधाता (वेल्डर) | १ वर्ष | SSC पास/नापास | 40 |
| ३. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | SSC पास | 20 |
| ४. | जोडारी (फिटर) | २ वर्ष | SSC पास | 20 |
| ५. | वीजतंत्री (ईलेक्ट्रीशयन) | २ वर्ष | SSC पास | 40 |
| | | | एकुण जागा | 140 |

*** वैशिष्ट्ये ***

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश गुणवत्तेवर व शासकीय नियमा नुसार दिले जातील. | ८. | परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर अखिल भारतीय स्तरावरचे प्रमाणपत्र |
| २. | सुसज्ज प्रशासकीय इमारत व कार्यशाळा. | ९. | अनुभवी व तंत्र निदेशक वर्ग |
| ३. | रोजगार/नोकरीची खात्री देणारे प्रशिक्षण. | १०. | प्रात्यक्षिकावर आधारित प्रशिक्षण |
| ४. | पात्र प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन. दरमहा ५००/- रुपये ८०% उपस्थिती अनिवार्य | ११. | एस.टी पासची सोय |
| ५. | ग्रंथालय सुविधा, सुसज्ज AVTS Room, Computer Lab. | १२. | अद्यायावत वसतीगृह सुविधा |
| ६. | सर्व प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांना कंपनी मधुन अप्रेंटिशीपची संधी | १३. | निसर्ग रम्य वातावरण |
| ७. | तंत्रनिकेतनास ( Diploma) थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश (अटी लागू) | १४. | ८०% उपस्थिती आवश्यक |

*** प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे ***

| अ.क्र. | प्रवेश तपशिल | प्रवेशासाठी आवश्यक मुळ कागदपत्रे |
|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती (SC) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| २) | अनुसूचित जमाती (ST) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| ३) | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग (VJNT-1, NT-2, NT-3) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ४) | इतर मागास प्रवर्ग (OBC) विशेष मागास प्रवर्ग (SBC) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ५) | अपंग, तांत्रिक, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, बोस्टर स्कूल | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, व संबंधीत EWS प्रमाणपत्र |
| ६) | अन्य (OPEN) संवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला |
| ७) | इतर प्रमाणपत्र | NCC, MCC, जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा प्रमाणपत्र/रहीवाशी दाखला/ तीन फोटो/आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँक पास बुक झेरॉक्स, |

* आपले प्रवेश अर्ज विहीत मुदतीत https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळा वरुन ऑनलाईन सादर करावे.

* प्रवेश माहिती पुस्तिका ही https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

* प्रवेश प्रक्रिया ही प्रवेश नियमावलीतील भाग १ व भाग २ दोन नुसार होईल.
प्रवेश प्रक्रिया शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी चालू राहील.

*

*** महत्वाची सुचना ***

१) ऑनलाईन प्रवेश भरल्यानंतर उमेदवारांना मिळालेला युजर आयडी व पासवर्ड जतन व नोंद करुन ठेवावा. पुढील प्रवेश प्रक्रियेच्या सर्व टप्पयावर अंतिम प्रमाणपत्र मिळेपर्यंत तो आवश्यक आहे.

२) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विहीत शुल्क भरावे.

३) अर्ज निश्चितीसाठी (Confirmation) जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट द्यावी. अर्ज निश्चित झाल्या शिवाय विकल्प (Option) दिसणार नाही.

४) अर्ज निश्चितीची पावती व निश्चित केलेल्या अर्जाची प्रत प्राप्त करुन घ्यावी व प्रवेश फेरीच्या वेळी संस्थेत सादर करावी.

५) अर्ज निश्चिती करताना भरलेल्या अर्जाची एक प्रत व सर्व आवश्यक कागदपत्राची झेराक्स प्रत जोडावी. तसेच आवश्यक तेवढ्या प्रती काढून स्वतः जवळ ठेवाव्यात.

६) उमेदवाराने आपला अर्ज भरताना स्वःताचा किंवा आपल्या कुंटुबातील सदस्याचा चालू असलेला मोबाईल क्रमांक व आपला ई-मेल आयडी बिनचूक पणे नोंदवावा. प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी, बदलू नये. नोंदविलेला मोबाईल क्रमांक आपल्या आधार कार्डशी व बँक खात्याशी जोडलेला असणे आवश्यक आहे. त्या शिवाय SID पोर्टलवर आपला PRN जनरेट होणार नाही.

७) निश्चित झालेल्या अर्जाची (Confirmed Application) प्रत व शुल्क भरल्याची पावती जपून ठेवावी.

८) प्रशिक्षणार्थ्याने प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास पुर्ण प्रशिक्षण शुल्क वसुल करण्यात येईल.

९) प्रवेशाच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे व तीन झेरॉक्स सेट सोबत आणावे.

१०) प्रवेश निश्चित झाले नंतर जमा केलेले प्रशिक्षण शुल्क व अनामत रक्कम परत मिळणार नाही.

११) ऑनलाइन स्वरुपात शुल्क स्वीकारले जाणार नाही.

*** प्रवेशित उमेदवारांना खालील प्रमाणे शुल्क रोखीने भरावे लागेल. ***

| अ.क्र. | व्यवसायाचे नाव | कालावधी | खुल्या गटा करीता वार्षिक शुल्क रुपये (Open) | (Open) Total Rs. | मागासवर्गीया करीता वार्षीक शुल्क रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वीजतंत्री (इलेक्ट्रीशयन) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2000+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3250/- | 02 वर्षे 1250/- |
| 2. | जोडारी (फिटर) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2400+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3650/- | 02 वर्षे 1250/- |
| 3. | वेल्डर (संधाता) | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1200+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 2150/- | 01 वर्षे 950/- |
| 4. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1000+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1950/- | 01 वर्षे 950/- |
| 5. | ड्रेसमेकींग | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 800+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1750/- | 01 वर्षे 950/- |
| 6. | वसतिगृह | | अनामत 1000/वार्षिक शुल्क 1200 | 2200/- | 2200/- |

टीप :
प्रवेशाच्या सविस्तर माहिती साठी संस्थेत प्रत्येक्ष संपर्क साधावा.

प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट
जिल्हा सोलापूर.